**कलम ४ (१)(ख)(२) ‘‘नमुना– ख’’**

**पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्ये.**

**अ)** लाचलुचपत प्रतिबंधक विभागात काम करणारे पोलीस अधिकारी हे पोलीस अधिकारी म्हणूनच राहतील व त्यानुसार विविध अधिनियमान्वयेचे अधिकार त्यांना असतील.

**ब)** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, आदेश क्रमांक : AC/3059-V, dated 23/10/1961 नुसार वर नमूद केलेला अधिकारी जेव्हा महाराष्ट्रातील कोणत्याही जागी गुन्हयाचा तपास करील तेव्हा ती जागा ज्या पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत येईल त्या पोलीस ठाण्याचा तो अधिकारी प्रभारी अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

**क)** भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम मधील कलम १७ मध्ये नमूद केलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने पारीत केलेले महाराष्ट्र शासन, गृह विभाग, आदेश क्रमांक : MIS/0389/767/CR-140/Pol-3, dated 19th April, 1989 नुसार पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ नुसार तपास करण्यास अधिकृत केलेले आहे.

......